2024-2025


आदिवासी साहित्य, संस्कृती आणि अस्मितेचे प्रतीक

ISSN 2319-6033

१५ डिसेंबर २०२४
वर्ष १८ वे, अंक १
पृष्ठ २४, किंमत रु. ३५/-

फडकणी

(मासिक)



स्वातंत्र्याच्या पंच्याहत्तर वर्षानंतरही या देशातील राज्यकर्त्यांनी अत्यंत निर्दय आणि क्रूरपणे आदिवासींच्या जल–जंगल आणि जमिनीवर आक्रमण करून आदिवासींचे अस्तित्त्व नष्ट केले आहे. झारखंडमध्ये वन लॅक मैन, नो वन स्क्रेअरफूट लँड सारखी परिस्थिती निर्माण केली आहे. नर्मदा सरोवरामुळे महाराष्ट्र, गुजरात आणि मध्यप्रदेशातील लाखों आदिवासींना त्यांच्या जल–जंगल–जमीन–भाषा–संस्कृती पासून कायमचे उद्ध्वस्त केले आहे. झारखंडमध्ये वेदांत कंपनीने आदिवासींची हजारो एकर जमीन गिळंकृत करून त्यांना बेघर केले आहे. छत्तीसगडमधील आदिवासींची जमीन उद्योगपतींच्या घशात घालण्यासाठी सरकारने हजारो आदिवासींना त्यांच्याच जमिनीवरून हुसकून लावले आहे. महाराष्ट्र शासनाच्या सरकारी सेवेत हजारो बोगस आदिवासींनी खऱ्या आदिवासींच्या नोकऱ्या बळकावल्या आहेत. मेळघाटातील 'टायगर प्रोजेक्टसाठी' पंचेचाळीस हजार आदिवासींना कायमचे विस्थापित केले आहे. क्या इस देश को आदिवासियोंसे ज्यादा सचमुच बाघ की चिन्ता है?

आदिवासींच्या हक्कांवर आक्रमण करणाऱ्यांविरुद्ध लढण्यासाठी, आंदोलनाची भूमिका ठरविण्यासाठी आणि आपल्या अस्तित्वाच्या लढ्यासाठी वैचारिक बैठकीची आवश्यकता आहे. प्रा. वसंत कनाके यांचे 'आदिवासींच्या हक्कांवरील आक्रमणे' हे एक वैचारिक आंदोलन आहे. त्यांनी मोठ्या धाडसाने आदिवासींच्या अनेक प्रश्नांना मुखर केले आहे. त्यांच्या या वैचारिक ग्रंथाचे आदिवासी साहित्य चळवळीत स्वागत करूया. त्यांच्या पुढील लेखनासाठी आमच्या हार्दिक शुभेच्छा!

–संजय लोहकरे

संपादक–डॉ. सुनील घनकुटे । रामदास गिळंदे

DAM

- मुख्य संपादक : डॉ. संजय लोहकरे
- सहसंपादक : डॉ. मारुती आढळ
  डॉ. सोनू लांडे
- उपसंपादक : प्रा. रामदास गिळंदे
  मा. संजय इधे
- कार्यकारी संपादक : डॉ. चिंतामण धिंदळे
  डॉ. सुनील घनकुटे
  प्रा. यशवंत भांडकोळी
- प्रसिद्धी
  देवराम आढळ — सुनील फलके
  पंकज इरनक — डॉ. विष्णू बोरसे
- संपादक मंडळ
  कृष्णा साबळे — तुकाराम धांडे
  देवदत्त चौधरी — कैलास धिंदळे
  अभिजित करवंदे — अभिमन्यू दारसिंबे
  रोशन जांबू — सीता भोजने
  रोहिदास डगळे — मेजर विठ्ठल बांगर

- अक्षर जुळवणी– संजय महल्ले
  मेधा पब्लिशिंग हाऊस
  'अक्षरवेल', नरसम्मा कॉलेजजवळ
  किरणनगर, अमरावती ४४४६०६ (महाराष्ट्र)
  मोबा. ९४२३६२२६६७
  E-mail-medhaphouse@gmail.com
- प्रकाशन स्थळ/पत्र व्यवहार
  संपादक – डॉ. संजय यशवंत लोहकरे
  निरगुडेवाडी (विठे) ४२२ ६०४
  ता. अकोले जि. अहमदनगर
  मोबा. 09657549076, 9404979683
  E-mail-phadki@rediffmail.com
- मूल्य : रु. ३५/-

(मासिकातील लेखांशी संपादक सहमत असेलच असे नाही.)

अनुक्रमणिका *

* झाडांशी जैविक नाते जडणारा कवितासंग्रह — ३
  –डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर
* लोकशाही माझे स्वप्न — १०
  –वाहरू सोनवणे
* वेळूचं बन : एक सकस काव्यशिल्प — ११
  –डॉ. संजय लोहकरे
* 'शिबली' या कादंबरीचे वाङ्मयीन मूल्यमापन — १५
  –डॉ. कुंडलिक पारधी
* बाबासाहेब... — २४
  –वाहरू सोनवणे

वर्गणीचे दर

वार्षिक : 400 रु., दशवार्षिक : 3500 रु.
आजीव : 6000 रु.
संपादकीय पत्त्यावर मनी ऑर्डर, चेक
किंवा डिमांड ड्राफ्टने वर्गणी पाठवावी
'फडकी' या नावाने चेक/डिमांड ड्राफ्ट असावा.

बँक ट्रान्सफरने वर्गणी भरण्यासाठी तपशील
बँक ऑफ महाराष्ट्र शाखा, अकोले जि. अहमदनगर
'फडकी' (Fadaki) या नावाने बचत खाते
खाते क्र. 60307966854
IFSC Code : MAHB 0001641
MICR No. : 422014502

ISSN 2319-6033

'ना' झाडांशी जैविक नाते जडणारा कवितासंग्रह

डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर

प्राचार्य, बी.डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव,ता. आंबेगांव जि. पुणे. ४१२४०८

डॉ. संजय लोहकरे यांचा 'झाड कधीच कुणाच्या मालकीचं नसतं' हा पाचवा कवितासंग्रह आहे. डॉ. संजय लोहकरे हे आदिवासी साहित्याच्या काव्यप्रांतातील एक नामवंत कवी म्हणून ओळखले जातात. मराठीतील परिवर्तनवादी साहित्यात कार्यकर्ता कवी म्हणून ते ओळखले जातात. विशेषत: आदिवासी साहित्य चळवळीतील ते कार्यकर्ते कवी आहेत. याशिवाय लेखक, कथालेखक, समीक्षक, वक्ता, संशोधक, संपादक, आदिवासी लोकसंस्कृतीचे चिंतक, प्राध्यापक इ. विविध भूमिका ते अगदी सहजपणे निभावतात. असे हे बहुश्रुत व्यक्तिमत्त्व आहे. 'झाड कधीच कुणाच्या मालकीचं नसतं' हा कवितासंग्रह धुळे येथील अथर्व पब्लिकेशनने प्रथमावृत्ती १० जुलै २०२४ रोजी प्रकाशित केला आहे.

या संग्रहात ५२ कवितांचा समावेश आहे. आदिवासी समाज ज्या निसर्गावर उत्कट प्रेम करतो, त्या निसर्गाबद्दल, निसर्गातील घटक, वस्तू, पशू, पक्षी, झाडे इ. नैसर्गिक साधनाला कवीने आपल्या भावना आविष्कृत केलेल्या आहेत. कवीने या संग्रहाच्या सुरुवातीलाच त्यांच्या 'कवितेची जन्मकथा' आपल्या मित्राबरोबर प्रवास करताना आलेल्या अनुभवातून सहज उलगडून सांगितली आहे. पाण्यासारखी निसर्गाने भरभरून दिलेली संपत्ती विकत घ्यावी लागली, याची खंत कवितेच्या जन्मकथेतून व्यक्त केली आहे. पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश इ. पंचतत्त्वे निसर्गाने भरभरून माणसाला दिलेली आहेत. या पंचतत्त्वांचा माणसाने स्वार्थासाठी व्यापार मांडला आहे. या बद्दलचा राग, कविमनात आहे. या राग आणि अस्वस्थ अवस्थेतून या संग्रहाची शीर्षक कविता सूचित झाली आहे. उदा.

झाड, कधीच कुणाच्या मालकीचं नसतं
मुळ्यांपासून शेंड्यापर्यंत
नाही तर
सावलीही विकली असती ऑक्सिजनच्या भावाने

काव्यकलाकृतीच्या निर्मिती प्रक्रियेबद्दल संजय लोहकरे म्हणतात की, ''माझी कविता अशा असंख्य अनुभवांतून, म्हणजे दारिद्र्य, अवहेलना, कुचंबना, उपासमार, संघर्ष, स्वाभिमान, जिद्द, धाडस, आनंद, समाधान, सहकार्य या साऱ्या कच्च्या मालातून जन्म घेते. प्रतिकूल परिस्थिती आणि असंख्य अनुभवांचा कच्चा माल भरलेला असतो. ते शब्द रिकामे नसतात. त्यांना भरजरी शब्दांचा मुलामा नसतो. त्या शब्दांच्या आत मी अनुभवांचा दारुगोळा, आनंद आणि समाधानाचे असंख्य कण सातत्याने भरतो. म्हणून शब्द रीता वाटत नाही. तो कधी संघर्षांसाठी उभा राहतो. कधी माणसांना जवळ करतो. कधी लबाड कोल्ह्यांचा बुरखा फाडतो. कवितेची जाण असलेल्या शब्दांची पोटं फाडतो. आतली बारूद काढतो. त्याची शक्ती मोजतो. त्या शक्तीचा परिवर्तनासाठी, आनंदासाठी, कलेसाठी, मानवाच्या सुखासाठी की अन्य कामासाठी उपयोग होईल, याचा शोध घेतो. म्हणून स्फोट होण्याच्या भीतीने अनेक जन शब्दांच्या जवळ फिरकत नाहीत.'' यासून कवी काव्य निर्मितीच्या पारंपरिक व प्रस्थापित विचाराला छेद देतात. काव्यनिर्मितीच्या जीवनवादी भूमिकेचा स्वीकार करतात.

या संग्रहातील 'पोरी बाजारा निंगाल्या', 'आदिवासी', 'झाड कधीच कुणाच्या मालकीचं नसतं', 'भूगोल', 'फालिस्ट', 'साम्यवाद आणि मानवतावाद', 'झाड आणि माणूस', 'एक पृथ्वी, एक झाड', 'स्वातंत्र्य, 'एन. जी. ओ. पाहिजेत' इ. कविता लक्षवेधक आहेत. शीर्षक नसलेल्या कवितेतूनही कवीने आदिम, आदिवासी जीवनाचे भेदक शोषित, वास्तव जीवनानुभूती अधोरेखित केली आहे.

बाजार हे खरेदी-विक्रीचे केंद्र आहे. जीवनावश्यक वस्तू खरेदी करणे, भाजीपाला, खाऊ, लहान मुलांचा विरंगुळा, आनंद इ. चे केंद्र म्हणजे आठवडे बाजार. परंतु, बाजारातील दुकानदार, सावकार इ. च्या विकृत नजरा मात्र आदिवासी महिलांवर स्थिरावतात. हे कवीने 'पोरी बाजारा निंगाल्या' या कवितेतून रेखाटले आहे. आदिवासी महिलांचे दारिद्र्य, त्यांचे कष्ट, परिश्रम इ. बद्दल नकारात्मक दृष्टिकोन दिसतो. या. कवितेतील स्त्री नायिका म्हणते की,

''म्हणून
आता मी हाटकून टाळते बाजारात जाणं
नवरा सोबत असतानाही
आणि गेलेच कधी तर
गोज्या तेल्याच्या दुकानात
धाडसानं विचारते
साबन देता का?
तेव्हा तो उलट विचारतो
माझ्या सर्वांगावर नजर खिळवून
'कोणता?
कापडांचा का आंघोळीचा?'
तेव्हा माझ्या तोंडून
गपकन शब्द बाहेर पडतात
अंगाला चिकटलेल्या लोकांच्या नजरा
धुवायचा. (१८)

दुकानदार, सावकार यांच्या विकृत नजरा साफ करणाऱ्या साबणाची मागणी या कवितेतील स्त्रीने केली आहे. या देशातील आदिवासींचा येथील मातीशी नाळे सारखा संबंध आहे. मातीशी, देशाशी आदिवासी कधी प्रतारणा करू शकत नाही. आदिवासी नसलेल्या आदिवासींना आदिवासीपण सिद्ध करता येणार नाही. 'आदिवासी' या कवितेत कवी म्हणतात की,

''बुद्धाला धर्म सांगताना
आधी नाळ जोडावी लागली होती
आदिवासी संस्कृतीशी
रावण संवाद घडवावा लागला होता
माणूसकीशी
ही खोटी नाळ तोडणाऱ्यांनो
तुम्हाला कोणत्या देशाचे नागरिक म्हणावं ? (पृ. २२)

कवीने या कवितेतून आदिवासींचे आदिमपण आणि बिगर आदिवासींचे उपरेपण अधिक ठळकपणे रेखाटले आहे. आदिवासी हा येथील परंपरा, संस्कृती, आदिम जीवन, निसर्ग इ. शी एकनिष्ठ आहे. जन्म आणि मृत्यू निसर्गाशीच एकरूप आहे.

शालेय अभ्यासक्रमात गुरुजी विद्यार्थ्यांना भूगोल शिकविताना काश्मिर, टुंड्रा प्रदेश, इग्लू घरे इ. त्यांच्या मेंदूत कोंबतात. शाळेतील विद्यार्थी सजग, जागृत आहे. आमचा आदिवासींचाही भूगोल शालेय अभ्यासक्रमात येत नाही. ही शालेय अभ्यासक्रम रचनेतील मर्यादा विद्यार्थी 'भूगोल' या कवितेतून लक्षात आणून देतात. उदा.

''आरे, आसं सगळं आस्ताना
हजारो मैल दूरचा भूगोल
शिकविण्यापेक्षा
आमचाच भूगोल आम्हाला
का नाही शिकविला?

ISSN 2319-6033

म्हणजे आप जाणिवांची नाळ
आमच्या माणसांपासून
संस्कृती समाज बोलीपासून
तुटली तरी नसती.'' (पृ. ४१)

शिक्षण ही समाजपरिवर्तनाची, बाल मनावर, विद्यार्थी मनावर सुसंस्कार घडविणारी, नवसमाज निर्मिती घडविणारी केंद्रं असताना, अभ्यासक्रमातील विषमता, भौगोलिक विषमता कवीने अधोरेखित केली आहे. आदिवासी मुलांना स्व जाणिवांपासूनच दूर लोटले जात आहे. परिणामी आदिवासी विद्यार्थी आपल्या माणसांपासून, संस्कृती, समाज, बोलीपासून तुटत चालला आहे.

जल, जंगल, जमीन इ. वर आदिवासींचा हजारो वर्षांपासून पारंपरिक हक्क आणि अधिकार असताना इंग्रज सरकार, नंतर स्वराज्यातील भारत सरकार यांनी नवे कायदे आणून आदिवासींना आपल्या पारंपरिक हक्क आणि अधिकारांपासून वंचित केले. नवा जंगल कायदा आदिवासींवर लादला गेला. परिणामी आदिवासींच्या अस्तित्वाचा प्रश्न गंभीर झाला. उदा.

आरं, स्वातंत्र्य म्हंजीच फालिस्ट
आन् आपून डुकरा, भ्याकरा
आन् रानपाखरा
आता तेच पारधी
शिकार करतील आपली
जल जंगल जमीन
तेंच्या बापाची व्हईल
आपली आरोळी
तेंच्या रानात दाबली जाईल
फालिस्टाचा कायदा समदेली लागू होईल. (पृ. ४३)

या पृथ्वीतलावरील आद्य रहिवासी, मूळनिवासी आदिवासी हाच शिकार झाला आहे. आदिवासींचा आवाज दाबला जातो आहे.

वस्तू विनिमय पद्धतीमुळे या देशातील आदिवासी समाजातील साम्यवाद नाहीसा झाला. कौटिल्याच्या अर्थशास्त्रीय सिद्धांताने साम्यवादी व्यवस्थेला नकार दिला.

उत्पादनातील समूहभावना नष्ट होऊन व्यापारीकरणाला, अर्थकेंद्री व्यवस्थेला चालना मिळाली. अस्तित्वासाठी संघर्ष करताना लढा दिला. परंतु सत्ताधारी वर्ग आणि त्यांचा कायदा यामुळे आदिवासींच्या कत्तली झाल्या. इतिहासही जेत्यांचा लिहिला गेला. आमचा पराजय, दारिद्र्य, विवंचना भाताच्या रोपावाणी मनात रुतून बसला आहे. उदा.

''निसर्ग आणि माणूस
माणूस आणि इतिहास
जय आणि पराजय
या सर्वांपेक्षा श्रेष्ठ असतो मानवतावाद
तोच आमच्या नसानसांतून वाहतो
एका पिढीतून दुसऱ्या पिढीत
त्याचा अभिमान जागा ठेवतो.
आमच्यातला माणूस'' (पृ. ४५)

आजच्या व्यापारकेंद्री, व्यक्तिकेंद्री जागतिकीकरणात माणसातला माणूस जागा ठेवणे हेच मोठे आव्हान आहे, हे विचार कवीने प्रस्तुत कवितेत सांगितले आहेत.

'झाड आणि माणूस' या कवितेतून कवीने दोन्ही घटकांचा अद्वैतनाते संबंध स्पष्ट केला आहे. झाड या पृथ्वीतलावर पहिला सजीव घटक आहे. तरीही माणसाने झाडांची अमानूष कत्तल केली आहे. या पृथ्वीतलावरील मानवतावादाचे द्योतक झाड आहे. झाडे, झुडपे या नैसर्गिक घटकांकडे कमालीचा परोपकार आहे. माणसाने मात्र झाडाकडे असलेल्या मानवतावादाकडे दुर्लक्ष केले आहे. माणसाने झाडाला किंमत दिली नाही. म्हणून

कवी प्रस्तुत कवितेत म्हणतात की,

'झाड म्हणजे झ्याट नव्हे
जे केव्हाही उपटून फेकता येतं'

इतकंही माणसाने झाडापासून शिकू नये ? (पृ. ४६)

माणसाच्या मेंदू, मन, हाताने निसर्गावर दहशतवाद पसरविला आहे. निसर्गाची सहनशीलता, परोपकार, धर्म माणसाच्या लक्षात आला नाही. माणसानेच 'अति तेथे माती' करून टाकली आहे.

पृथ्वीतलावरील झाडांचा गुणधर्म विलक्षण आहे. झाडांच्या ठिकाणी असलेली सहनशीलता, परोपकार, मानवता पराकोटीची आहे. झाडांच्या मुळ्या हजारो दिशांना जमिनीत विस्तारतात. इतकी व्यापक निष्ठा माणसांकडे नाही.

कवी 'एक पृथ्वी, एक झाड' या कवितेत म्हणतात की,

'झाड सावलीत बसणाऱ्याला जात विचारत नाही
आणि उन्हात बसणाऱ्याच्या धर्मावर बोलत नाही
माणसं उगीचंच जातिधर्माच्या दंगलीत
अमानवी मूल्यांना जन्म देतात
झाड़, फळ खाणाऱ्याला गरीब, श्रीमंत
असे विचारत नाही
आणि माणसांची प्रतिष्ठा मात्र
गरीब, श्रीमंतीवरून माणूस ठरवितो
माणसाच्या मानाची मुळे
मानवतावाद शोधत, अशी हजारो दिशांनी विस्तारत
का जात नाहीत ? (पृ. ४८)

या कवितेतून कवीने 'पृथ्वी'ची एक नवी मिथ्स् मांडली आहे. पृथ्वी, आकाश, चंद्र, सूर्य, तारे, झाडे इ. पारंपरिक मिथ्स् कवीने नाकारल्या आहेत. मानवजातीला उद्देशून पृथ्वी आणि झाड यांचा नवा अन्वयार्थ कवीने मांडला आहे. पृथ्वी आणि झाडाला कोणतेही सामाजिक भेदभाव मान्य नाहीत. सामाजिक समतेचा संदेश पृथ्वी आणि 'झाड' या नव्या मिथ्समधून कवी देतात. पृथ्वी सर्वांना आधार देते. झाडे सर्वांना सावली देते- फळे देतात. जात, धर्म, गरीब, श्रीमंत असे कोणतेही भेदभाव झाड पाळत नाही. 'पृथ्वी' आणि 'झाड' या दोन्हीतून एकत्वाचा, समतेचा संदेश कवीने दिला आहे.

'झाड' या नव्या मिथकातून समतोल विचार कवीने मांडला आहे. झाडांच्या फांद्या दोन्ही बाजूंना समतोलपणे वाढतात. अगदी असेच आदिम माणसाचं जगणं आहे. उदा.

''जागतिकीकरण स्वीकारेल तेव्हा
जागतिकीकरण आणि वैश्विकीकरण
झाडासारखे समतोल होतील
माणूस झाडासारखा होईल
दोन्ही फांद्यांवर सजीव नांदतील
मग बुद्धाचा विचार धर्म होणार नाही
तो मानवतावादी विचार होईल.'' (पृ. ५०)

झाडासारखा सामाजिक समता, बंधुभावाचा विचार मानव जातीत रुजला पाहिजे. 'झाड' हे मानवतावादाचे मिथक कवीने नव्याने मांडले आहे.

डॉ. संजय लोहकरे यांनी या संग्रहातून मराठी वाचकांसाठी हिंदी भाषेतील काही कविता सादर केलेल्या आहेत. उदा. 'स्वातंत्र्य, 'राघोजी दादा, 'मैं एक दिन, 'उन्नीसवी सदी का', 'यही देश, 'देश दुनिया भटकता रहा इन्सान', 'जब मैं जंगल से गुजरता हूँ' इ. काही कविता लिहिलेल्या आहेत. या हिंदी भाषेतील कवितामधूनही कवी लेखनगर्भ आशय-विषयांपासून दूर जात नाही. या कवितांमधून भारतीय स्वातंत्र्याने आदिवासींची निराशाच केली आहे. बुंदेलखंड, मेळघाट, सह्याद्री इ. प्रदेशातील आदिवासींना भूक, बिमारी, वेठबिगारी, कुपोषण, भूकबळी, शिक्षण,

आरोग्य इ. सोयींना आजही सामोरे जावे लागते हे आजचे वर्तमान वास्तव कवीने रेखाटले आहे. उदा.

''इस देश की स्वतंत्रता का अर्थ
अधिक स्पष्ट होता है
स्वतंत्रताने किसकिसको मजबूर किया
और किसकिसको बडा'' (पृ. ५१)

स्वातंत्र्याबद्दल कवीने चिकित्सा करून यावर उपाय म्हणून काय करावे लागेल, याचा सल्लाही कवितेतून दिला आहे. उदा.

''इस स्वतंत्रता के विरुद्ध
तिरकमठा उगार लो.'' (पृ. ५१)

या देशातील आदिवासी क्रांतिकारक हे केवळ आंदोलनकर्ते नाहीत, तर अस्मितेसाठी लढणाऱ्या आदिवासी समाजाचे कैवारी, न्यायदाते आहेत. कवी आपल्या 'राघोजी दादा' या कवितेत म्हणतात की,

''राघोजी दादा, तंट्या मामा, बिरसा बाबा, काळू काका ये केवल आंदोलनकारी नही हैं, आदिवासी जीवन की अस्मिता का मिसाल हैं, (पृ. ५२)

या संग्रहात शीर्षके नसलेल्या कवितांमधून कवीने ब्रिटीशांची परकीय सत्ता, इंग्रजांच्या गुलामगिरी विरुद्ध लढणारे बिरसा मुंडा, बिरसामुंडाचा उलगुलानचा नारा, अन्न, वस्त्र, निवारा या मुलभूत गरजांसाठी आंदोलन करणारा आदिवासी समाज रेखाटला आहे. आदिवासी विरुद्ध गैर आदिवासी, संस्कृती विरुद्ध विकृती, प्रकृती विरुद्ध कृत्रिमता, निसर्ग विरुद्ध भोगवाद, अहिंसा विरुद्ध हिंसा असा विरोधाभास चित्रित केलेला आहे.

या शिवाय कवी जंगल, झाडे, सावली, नदी, पशू, पक्षी, मातृसत्ताक देवता - कलमजा, सटवाई, घोरपडामाई, घाटनदेई, वरसुबाई, ताथवडी, रानुबाई, दुर्गुवाई, दऱ्याबाई, गडदुबाई, बालभैरवी, कलसुबाई इ. ना वंदन करतात. सरकारकडून शेतकरी आत्महत्यांचे समाजकारण केले जाते.

लोकशाही व्यवस्थेतील ठोकशाहीचे चित्रण केले आहे. उदा.

आत्महत्या नि राजकारण
अनुदानाचं समाजकारण
देशाच्या तिजोरीवर कर्जाचा तिढा
नि भुईच्या देवाला
मातीच्या मालकाला
जिवंत गाडा
शेतकऱ्याला गाडणारी लोकशाही नि
अनुदान लाटणारी ठोकशाही (पृ. ६०)

या भूमीच्या भूपतीला जिवंत गाडणारी नीती राबविली जाते. राजकारण, समाजकारणाच्या नावाखाली 'अनुदान' संस्कृतीमुळे शेतकऱ्याला नादान बनविले जाते.

शेतकऱ्याला योग्य व किफायतशीर मूल्य देण्यापेक्षा सरकारला अनुदान देणे परडवते.

'पृथ्वीचे प्रेमगीत' लिहिणाऱ्या कवी कुसुमाग्रजांनी पृथ्वीकडे प्रेमाचे मिथक म्हणून पाहिले आहे. तर 'पृथ्वीचे आक्रंदन ऐकतो आम्ही' ही कविता डॉ. संजय लोहकरे यांनी लिहून 'पृथ्वी'चे पारंपरिक मिथ्स् नाकारले आहे. जंगलातील किडे, मुंगी, पशू, पक्षी इ.च्या नैसर्गिक हालचालींवरून तिचे दु:ख, आनंद, तिचे वृध्दत्व आदिवासींच्या लक्षात येते. बिगर आदिवासींचे कलम पर्यावरणाच्या लक्षात येते. आदिवासींचे जैविक आणि सांस्कृतिक सजीवपण पृथ्वीला ओळखता येते. कारण-

''पृथ्वीचे आक्रंदन ऐकतो आम्ही
रात्रंदिवस निबिड जंगलात
ती फक्त आमच्याशीच बोलू शकते
तिच्या केंद्रापासून आसापर्यंत
तिला माहीत आहे आमचं रक्ताळ नातं

नैसर्गिक विजातीय आणि सजातीय पर्यावरणातील (पृ.६३)

पृथ्वी आदिवासींशी संवाद साधते. पृथ्वी आणि आदिवासी यांचे नातेसंबंध कसे नैसर्गिक आहे, हे पृथ्वीला ज्ञात आहे.

सरकारी शिक्षणविषयक धोरणे, कुटुंब व बालकल्याण विषयक सरकारची धोरणे, शाळेतील मुलांचे मुलभूत हक्क इ. बाबत सरकारची विसंगत धोरणे कवीने आविष्कृत केली आहेत. उदा.

''एक दिन सरकार
टिवी पर कुछ घोषणा कर रहा था
बच्चों को अच्छी शिक्षा
स्कूल, कपडा और दूध भी
तब माँ के थाने को चूचकता हुआ बच्चा
तिठी नजरोंसे टिवी देख रहा था
और देखते देखते सोच रहा था
माँ के अलावा दूध कहाँ मिलता है ?
मुझे नही चाहिए '' (पृ. ६४)

प्रसार माध्यमातील सरकारी घोषणा, शालेय पोषण आहार इ. बद्दल आदिवासी मुले सजग, जागृत आहेत. सरकारी धोरणाला नकार देण्याचे सामर्थ्य मुलांकडे असल्याचे कवीने रेखाटले आहे.

झाडे आणि जंगलावर कवीचे निःसीम, निस्वार्थी, मनस्वी प्रेम आहे. झाडाकडे असलेली पराकोटीची सहनशीलला, परोपकार कवीने अधोरेखित केलेला आहे. उदा.

''झाड वाऱ्या पावसात उन्मळून पडताना
आणि माणसाच्या हातून कत्तल होताना
ते दुःखी होत नाही
किंवा माणसाचा,निसर्गाचा द्वेष करीत नाही?''
(पृ.७१)

'झाड आणि गूल' हे सहृदय नाते कवीने रेखाटले आहे. झाडाकडे द्वेषमूलक भाव नाही. झाडाने घोषित केलेली लोकशाही समग्र सजीव सृष्टीची लोकशाही ठरेल, असा विश्वास कवीने व्यक्त केलेला आहे. या लोकशाहीची घटना 'झाड' हीच असेल.

जल, जंगल, जमीन इ. वर आक्रमण करून विकासाच्या नावाखाली जंगलतोड, आदिवासींची संस्कृती नष्ट करणे, धर्मांतर, वनवासी, जंगली, लंगटे, राक्षस इ. उपाध्या बहाल करणे, शिक्षणाच्या माध्यमातून धर्मशिक्षण, जंगलाला राष्ट्रीय संपत्ती घोषित करणे, जंगल ठेकेदार, इ. बाबत आदिवासींचा आवाज बंद केला जातो आहे. अशा परिस्थितीत आदिवासींना आपला स्वाभिमानाचा लढा का आठवत नाही. या बाबत कवी म्हणतात की,

''कुठे जातो तेव्हा तुझ्या रक्तातला स्वाभिमान?
क्रांतीची भाषा नि चळवळीची नशा
तुला आठवत नाही का राणी झलकारी
राणी दुर्गावती, जिजाबाई भांगरे, रुख्मीणी खाडें
दसरीबेन चौधरी ?
का, तुझ्या स्वाभिमानालाच लाचारीची मूठ मारतात
हे लबाड एनजीओ?'' (पृ. ७६)

परिवर्तन, बदल, संस्कार हा ज्या व्यवस्थेचा मूलगाभा आहे, ती शिक्षण व्यवस्था जागतिकीकरणामुळे भ्रष्ट झाली आहे. वांझोटी ठरली आहे. आजच्या शिक्षण व्यवस्थेबद्दल कवी मूलगामी विचार मांडत आहे. उदा-

श्रमप्रतिष्ठेचं व्हावं शोषण
नि श्रम करणाऱ्याचं कुपोषण
निष्ठा नि प्रामाणिकता ठेवावी डांबून
धर्माची स्थापन व्हावीत विद्यापीठं
धर्ममार्तंड व्हावा कुलगुरू
नि उद्योगपती व्हावा कुलसचिव'' (पृ. ८९)

ISSN2319-6033

प्रस्तुत काव्यस्तवाला वर्तमान राजकारण आणि सत्ताधीश खतपाणी घालत आहेत. राजकारणातील अनैतिक प्रवृत्तीने आज कळस गाठला आहे. कवी या संदर्भातील खालील कवितेत म्हणतात की,

''अनैतिक राजकारणाच्या अस्ताची सुरुवात
शत्रूने शत्रूचा काटा काढून होणार नाही
त्यासाठी
आख्या डांगाणालाच लावायचाय वणवा
शब्दांचा, स्वाभिमानाचा, अस्मितेचा आणि पराक्रमी इतिहासाचा
म्हणजे जळून जातील लाचारीची रोपं
गुलामीची कंदमुळे आणि
अखंड आराजकतेची पाळेमुळे.'' (पृ. ३४)

कवी अनैतिक राजकारणाच्या अस्तासाठी आशावादी आहे. वणव्याचा नवा अन्वयार्थ लावून कवीने शब्दसामर्थ्य, स्वाभिमान, अस्मिता, आदिवासींचा पराक्रमी इतिहास इ. च्या जागृतीमुळे लाचारी, गुलामी, अराजकता इ.ची पाळेमुळे नष्ट होतील. असा आश्वासक सूर व्यक्त केला आहे.

या संग्रहाचे प्रस्तावनाकार कवी प्रा. माधव सरकुंडे म्हणतात की, ''राजकारण आदिवासी समाजासाठी समस्यांचे महाभारत झाले आहे. राजकीय सत्तेत सहभाग मिळाल्यामुळे आदिवासींचे काही प्रश्न सुटतील, असे वाटत होते. परंतु तसे न होता प्रश्नांचे डोंगरच अदिवासींसमोर उभे झाले आहेत. ही सारी दुरावस्था कुणी जन्माला घातली असेल तर ती आदिवासी समाजातल्या नतभ्रष्ट राजकीय नेत्यांनीच !! नेत्यांची ही विकृती बघून कवी संजय लोहकरे यांच्या मनात विद्रोहाचा लाव्हा खदखदतो. म्हणून ते समाजमन पेटवण्याची भाषा बोलतात. त्यांचे शब्द निखारे होऊन फुलतात. त्यांची कविता आदिवासी समाजाचे दुःख, दैन्य, दारिद्र्य व शोषण दूर करण्यासाठी धडपडत राहाते?'' (पृ.१५)

परिवर्तन, प्रबोधने यावर कवीचा विश्वास आहे. प्रस्तावनाकार प्रा. माधव सरकुंडे म्हणतात की, ''त्यांच्या कवितेत आदिवासी अस्मितेचा हुंकार आहे. हुंदकाही आहे. कवी संजय लोहकरे हे आदिम वेदनेचे भाष्यकार आहेत. पांढऱ्या कागदावर काळ्या अक्षरांचा विलास करणाऱ्या तथाकथित कवींच्या इयत्तेत ते बसत नाहीत. सामाजिक बांधिलकीचे कंगण हाताला बांधून व्यवस्थेशी दोन हात करण्यास निघालेल्या कवितेचे ते धनी आहेत.

ते क्रांतिकारी कवितेचे जन्मदाते आहेत, म्हणूनच त्यांच्या कवितेत पित्याचे दायत्व आणि दरारा ही आहे. कविता लिहिण्याने माणूस कवी होतो या खुळ्या कल्पनेपासून ते कोसोदूर आहेत. ते कविता जगणारे आणि शब्दांची मशाल हातात घेऊन जाणारे कवी आहेत, म्हणून ते आदिमांचे जागतकरू आहेत.''(पृ. १२)

सारांश – कामगार कवी नारायण सुर्वे, 'गोधंड'कार' वाहरू सोनवणे, 'उलगुलान' कार कवी भुजंग मेश्राम इ.च्या काव्यलेखनाचा प्रभाव संजय लोहकरे यांच्या कवितेवर जाणवतो आहे. आदिवासींच्या नैसर्गिक, प्राकृतिक धर्मांशी कवीची नाळ जडलेली आहे. कवीच्या जीवन-जाणिवा आदिमांशी संलग्न आहेत. म्हणून निसर्गाने निर्माण केलेल्या घटकांशी आणि निसर्गाचं संवर्धन करणाऱ्या आदिवासी विषयी कवीचे नाते उत्कट आहे. मनस्वी आहे. म्हणूनच निसर्गातल्या विविध घटकांवर मालकी हक्क सांगणाऱ्या सावकार, भांडवलदार, प्रभुत्त्वशाली वर्गावर आपल्या कवितेतून परखडपणे भाष्य करतात. व्यक्ती, व्यक्तिच्या भावना यांना किंमत न देता केवळ वस्तू आणि वस्तूचे मूल्य यांना महत्त्व देणाऱ्या जागतिकीकरणाच्या मूल्याला कवी

नकार देतात.

कवीने आपल्या कवितेतून आदिवासींचे आदिमपण, अस्तित्व, अस्मिता, आदिवासी क्रांतिकारकांचे लढे शोषक वर्गाकडून होणारे अन्याय, अत्याचार, शिक्षण, कुपोषण, भूक, दारिद्र्य, व्यथा, वेदना, सरकारच्या धोरणातील विसंगती, विकास आणि प्रकल्प, विस्थापन, पुनर्वसन, माणसांना भय, तर प्राण्यांना अभय, अभयारण्ये, स्वातंत्र्यानंतरची निराशा इ. अनेक विषयांचे चिंतन कवीने घडविले आहे. कवीची भूमिका व्यवस्थाबदल व व्यवस्था परिवर्तनाची आहे. म्हणूनच कवी आदिवासी स्त्री-पुरुष क्रांतिकारक, लढाऊ महापुरुषांच्या विचारांची पेरणी आपल्या कवितेतून करतात. आदिवासी क्रांतिकारकांच्या विचारांच्या वणव्यात या देशातील वेठबिगारी, गुलामी, अन्याय, अत्याचार, अनैतिक राजकारण, अराजकता इ. ची पाळेमुळे नष्ट होतील, अशी आशा बाळगतात. निसर्ग आणि माणूस यांचे सहृदयतेचे, माणूसकीचे, झाड, पृथ्वी यांचेकडून मिळालेल्या परोपकार संवर्धनाचे नाते संबंध अधिक प्रगल्भ व्हावे, अशी अपेक्षा काव्यबद्ध झाली आहे.

संदर्भ:

'झाड कधीच कुणाच्या मालकीचं नसतं'
(कवितासंग्रह) डॉ. संजय लोहकरे,
अथर्व पब्लिकेशन्स, धुळे,
प्रथमावृत्ती : १० जुलै २०२४

***

लोकशाही माझे स्वप्न

मी पाहतोय स्वप्न नि
स्वप्न पाहते मला
स्वप्नातल्या स्वप्नात
स्वप्न सतावते मला

स्वप्नात गुदमरतोय मी
गुदमरतोय मी स्वप्नात
लोकशाही मुक्तीचे स्वप्न
स्वप्न मागतेय बलिदान

रोखलेल्या बंदुकांच्या पलीकडे उभी आहे ती
तिला बोलताही येत नाही चालताही येत नाही
ती एका दहशतीखाली दबलेली

बरं झालं माझ्याकडे बंदूक नाही, बंदूक धाक दाखवते,
जीव घेते

माझ्याकडे फक्त लेखणी आहे आणि माझी संस्कृती
लेखणी-जीवन सावरते आणि
संस्कृती-जीवनाचे सौंदर्य जपते

मानवतेचा आवाज एकवटून
लोकशाही नांदवायची आहे

लोकशाही घरात नांदते
गावात नांदते

लोकशाही सहमती दर्शवते सहकार्य करते
लोकशाही लोकांचीआचारसंहित
लोकांचा श्वास

शोषण, दमन ,वर्चस्वाच्या जोरावर हुकूमत गाजवणारी
व्यवस्थेला गाडायला माझी लेखणी सज्ज आहे

मी पाहतोय स्वप्न
स्वप्न पाहते मला

-वाहरु सोनवणे

***

 ISSN2319-6033